# सहसंचालक,, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर

**दुरध्वनी क्र.** 0712-2557266/46 **कार्यासन दु. क्र.** 0712-2557266

**E-mail : ronagpur@dtemaharashtra.gov.in** **Website: rdtenagpur.org.in**

**अत्यंत महत्वाचे**

**क्र.तशिस/प्राकाना/शैवि-1/150/2018/** 3541

**दिनांक:-** 24 OCT 2018

प्रति,

प्राचार्य/संचालक,
सर्व शासकीय, शासकीय अनुदानित व विना अनुदानित पदवी व पदवीका संस्था, पदव्युत्तर पदवी,
नागपूर विभाग, नागपूर.

विषय:- राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या 150 व्या जयंती निमित्य सोबतच्या आराखडयानुसार कार्यक्रम आयोजित करण्याबाबत.

संदर्भ:- तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे पत्र क्र. 16/गांधी जयंती 150/2018/561, दि. 23/10/2018

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने, महात्मा गांधी यांच्या 150 व्या जयंती निमित्य वर्षाभर कार्यक्रम आयोजित करण्याबाबतचा कृती आराखडा संदर्भिय पत्रान्वये या कार्यालयाकडे प्राप्त झालेला आहे. सदरहू आराखडा खालीलप्रमाणे देण्यात येत आहे.

सदरहू आराखडयानुसार आपल्या संस्थेत खालील आराखडयात दिलेल्या वेळापत्रक व कालावधीतच आयोजित करण्यात यावे व त्याबाबतचा अहवाल प्रत्येक महिन्याच्या शेवटच्या आठवडयात या कार्यालयाकडे (फोटो व Video सह) सादर करावा. सदरहू अहवाल राज्य शासनामार्फत केंद्र शासनाकडे प्रत्येक महिन्यात सादर करावयाचा असल्यामुळे कार्यक्रमाचे आयोजन करून अहवाल न चुकता या कार्यालयाकडे सादर करावा.

| अ. क्र. | कार्यक्रमांचा विषय | कार्यक्रम राबविण्याचे वेळापत्रक/ कालावधी |
|---|---|---|
| १ | महात्मा गांधी यांच्या जीवनावर आधारीत राज्यस्तर व राष्ट्रीय स्तरावरनाटकांचे रंगमंचावरील कार्यक्रम, निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा आयोजीत कराव्यात. **(विभागातील सर्व संस्थांनी आयोजन करावे)** | १ ऑक्टोबर ते १५ ऑक्टोबर २०१८ |
| २ | स्वच्छता अभियानातर्गत कार्यक्रम आयोजीत करावेत. **(विभागातील सर्व संस्थांनी आयोजन करावे)** | संपर्ण वर्षभर महिन्यातून एक दिवस (१ ऑक्टोबर२०१८ ते ०२ ऑक्टोबर २०१९) |
| ३ | श्रमदानाचे कार्यक्रम यांनी आयोजीत करावेत. **(विभागातील सर्व संस्थांनी आयोजन करावे)** | संपर्ण वर्षभर महिन्यातीन दुसरा शनिवार (१ ऑक्टोबर२०१८ ते ०२ ऑक्टोबर २०१९) |
| ४ | मानव संसाधन विकास विभागाने, महाराष्ट्राशी ज्या दुस-या राज्याची जोड ठरवून दिलेली आहे, त्या राज्याशी संपर्क करुन विद्यार्थ्यांची देवाणघेवाण कार्यक्रम राबविणे. | १ ऑक्टोंबर २०१८ ते ३० सप्टेंबर २०१९ |
| ५ | महात्मा गांधी यांच्या जीवनावर विद्यार्थ्यांचे गीतगायनाचे/भजन गायनाचे कार्यक्रम आयोजित करावेत. **(विभागातील सर्व अभियांत्रिकी पदवी व पदविका संस्थांनी आयोजन करावे)** | १ ऑक्टोंबर २०१८ ते ३१ ऑक्टोबर २०१८ |

| | | |
|---|---|---|
| ६ | एक खेडे दत्तक घेऊन तेथील सामाजिक केंद्रांमध्ये स्वच्छता अभियान व स्वच्छ भारत अभियान यांची माहिती देऊन तो उपक्रम राबवावा. **(विभागातील सर्व अभियांत्रिकी पदवी संस्थांनी आयोजन करावे)** | १ ऑक्टोबर २०१८ ते ०२ ऑक्टोबर २०१९ |
| ७ | महात्मा गांधींचा त्यांच्या जीवनकालावधीत महाराष्ट्रातील ज्या स्थळांशी संपर्क आला उदा. वर्धा,पवनार,पुणे, मुंबई इ.ठिकाणी पदयात्रा आयोजीत करुन जनजागृत्ती करावी. **(वर्धा जिल्हयातील सर्व पदवी पदव्युत्तर पदवी व पदवीका संस्थांनी आयोजन करावे)** | १ जानेवारी ते ३१ जानेवारी २०१९ |
| ८ | महात्मा गांधींच्या विचारांनवर आधारीत वक्तृत्व स्पर्धा आयोजीत कराव्यात. या विषयावर राज्यस्तर व राष्ट्रीय स्तरावर प्रसिध्द व्यक्तींना भाषणे देण्यासाठी आंमत्रित करावे. **(विभागातील सर्व संस्थांनी आयोजन करावे)** | १ ऑक्टोबर ते ३१ डिसेंबर २०१८ |
| ९ | विद्यार्थ्याकडून सार्वजनिक ठिकाणी महात्मा गांधींच्या विचारांचे भित्तीचित्रे तयार करुन घ्यावीत व त्यांचे मोठया प्रमाणात प्रदर्शन करावे. **(विभागातील सर्व संस्थांनी आयोजन करावे)** | १ जानेवारी २०१९ ते ३१ मार्च २०१९ |
| १० | वाचनालयांमध्ये महात्मा गांधींच्या जीवनावरील विविध राष्ट्रीय व आंतराष्ट्रीय लेखकांनी लिहीलेली पुस्तके मोठया प्रमाणात विद्यार्थ्यी वाचाकांसाठी उपलब्ध करुन दयावीत. तसेचगुजरात, राजस्थान, बिहार इ.राज्यांनी महात्मा गांधींच्या विचारांनवर आधारीत काही पुस्तके प्रसिध्द केली आहेत, ती सुधा त्यांच्या वाचनालयात उपलब्ध करुनदेण्यात यावीत. **(विभागातील सर्व संस्थांनी आयोजन करावे)** | १ जानेवारी २०१९ ते ३ सप्टेंबर २०१९ |
| ११ | महात्मा गांधींचे सामाजिककार्य व विचारांचा सर्व राज्यात प्रचार व प्रसार करण्याच्या दृष्टीने वार्षीक दिनदर्शीका तयार करावी व त्यानुसार तात्काळ कार्यवाही करावी. **(विभागातील सर्व शासकीय व अनुदानित संस्थांनी आयोजन करावे)** | १ ऑक्टोबर २०१८ ते ३० सप्टेंबर २०१९ |
| १२ | बिहार शासनाने महात्मा गांधींच्याजीवनावर प्रसिध्द केलेल्या बापू की कहानीया पुस्तकाचे मराठीत भाषांतर करवून घेऊन ते पुस्तक वाचनालयात उपलब्ध करुन देणे संदर्भात तात्काळ कार्यवाही करण्यात यावी. **(विभागातील सर्व संस्थांनी आयोजन करावे)** | १ जानेवारी २०१९ ते ३१ जुलै २०१९ |
| १३ | महात्मा गांधींच्या भजनांच्या गायनाचे कार्यक्रम या कालावधीत प्राधान्याने आयोजीत करावेत. **(विभागातील सर्व अभियांत्रिकी पदवी संस्थांनी आयोजन करावे)** | १ एप्रिल २०१९ ते ३१ ऑगस्ट २०१९ |
| १४ | सर्व विद्यार्थाच्या रॅली/पदयात्रा वेळोवेळी आयोजीत कराव्यात व त्यात सर्व विद्यार्थ्यांचा सहभाग अनिवार्य करावा. **(विभागातील सर्व संस्थांनी आयोजन करावे)** | १ ऑगस्ट २०१९ ते २ ऑक्टोबर २०१९ |

(गुलाबराव ठाकरे)
सहसंचालक
तंत्रशिक्षण वि.का., नागपूर

प्रत:- मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई (का.क्र.१६) यांना माहितीकरीता सविनय सादर.